**आकाशवाणी पुणे**
**प्रादेशिक वृत्तविभाग**
**राष्ट्रीय बातमीपत्र**
**सकाळी 08 वाजून 30 मिनिटं**

**दिनांकः 24.11.2024** **वारःरविवार**

---

**ठळक बातम्या**

1 महाराष्ट्र विधानसभा निवडणुकीमध्ये भाजप प्रणीत महायुतीला घवघवीत यश, भाजपाला सर्वाधिक 132 जागा

2 महाविकास आघाडीला मोठा फटका; अनेक दिग्गजांनाही पराभवाचा धक्का

3 झारखंड विधानसभा निवडणुकीत झारखंड मुक्ती मोर्चा पक्षाला मोठ यश

4 देशातल्या चार राज्यातील विधानसभा आणि लोकसभा पोटनिवडणुकीचे निकाल जाहीर

5 संसदेच हिवाळी अधिवेशन उद्यापासून सुरू होणार ,

आणि

6 बॉर्डर गावस्कर चषक कसोटी क्रिकेट मालिकेतल्या पहिल्या सामन्यात भारत मजबूत स्थितीत

**निकाल**

राज्याच्या विधानसभा निवडणुकीच्या निकालात महायुतीला घवघवीत यश मिळालं असून भारतीय जनता पार्टी हा सर्वात मोठा पक्ष म्हणून पुढे आला आहे. महायुतीतल्या प्रमुख घटक पक्षांना 231 जागांवर विजय मिळाला आहे. त्यात भाजपा 132, शिवसेना 57 आणि राष्ट्रवादी काँग्रेसला 41 जागांवर विजय मिळाला आहे. महाविकास आघाडीला या निवडणुकीत मोठा फटका बसला आहे. कॉंग्रेसला केवळ 16 जागांवर विजय मिळवता आला, शिवसेना उद्धव बाळासाहेब ठाकरे पक्षाला 20, तर राष्ट्रवादी काँग्रेस शरदचंद्र पवार पक्षाला फक्त 10 जागा मिळाल्या. अपक्ष आणि इतरांना 10 जागा मिळाल्या. विधानसभेच्या या निवडणुकीत राज्यातल्या मतदारांनी अनेक प्रस्थापितांना पराभवाचा

धक्का दिला आहे. काँग्रेसचे ज्येष्ठ नेते बाळासाहेब थोरात संगमनेर मतदारसंघातून पराभूत झाले. कराड दक्षिण मतदारसंघात पृथ्वीराज चव्हाण यांच्यासह पुण्यातील कसब्यातून रविंद्र धंगेकर, भोरमधून संग्राम थोपटे, जालन्यातून कैलास गोरंट्याल, मलकापूरमधून राजेश एकाडे, पुरंदरमधून संजय जगताप, लातूर ग्रामीण मतदारसंघात धीरज देशमुख यांचा पराभव झालेल्या प्रमुख उमेदवारांमध्ये समावेश आहे.

**पंतप्रधान**

महाराष्ट्रात महायुतीला मिळालेला दणदणीत विजय हा विकासवादाचा, सुशासनाचा आणि सामाजिक न्यायाचा विजय आहे, असं प्रतिपादन पंतप्रधान नरेंद्र मोदी यांनी केलं. महाराष्ट्र विधानसभा आणि विविध राज्यातल्या विधानसभेच्या पोटनिवडणुकांमध्ये भाजपाला मोठं यश मिळाल्यानंतर भाजपाच्या दिल्लीतल्या मुख्यालयात काल विजयोत्सव साजरा करण्यात आला; त्यावेळी ते कार्यकर्त्यांना संबोधित करत होते. महाराष्ट्रात असत्याचा, घराणेशाहीचा, नकारात्मक विचारांचा पराभव झाला आहे; महाराष्ट्रानं विकसित भारताच्या संकल्पाला आणखी बळकट केल्याचं या यशातून सिद्ध होतं, असं मोदी म्हणाले.

**प्रतिक्रिया**

महायुतीच्या या विजयानंतर मुख्यमंत्री एकनाथ शिंदे, उपमुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस आणि उपमुख्यमंत्री अजित पवार यांनी काल मुंबईत एकत्रित पत्रकार परिषद घेत जनतेचे आभार मानले. राज्यातल्या विकास कामांना दिलेलं प्राधान्य, समाजातील सर्व घटकांसाठी राबवलेल्या कल्याणकारी योजना आणि महायुतीच्या सर्व घटक पक्षांनी एकत्रितपणे केलेलं काम यामुळे महायुतीला हे यश मिळाल्याचं मुख्यमंत्री एकनाथ शिंदे म्हणाले. दरम्यान, राज्यातल्या सत्ता स्थापनेच्या घडामोडी ना वेग आला असून महायुती  मधील तिन्ही पक्षाचे प्रमुख एकत्र बसून चर्चा करतील आणि मुख्यमंत्री ठरवतील अस एकनाथ शिंदे यांनी काल पत्रकारांशी बोलताना सांगितल .

**झारखंड**

झारखंड विधानसभा निवडणुकीत 81 जागांपैकी झारखंड मुक्ती मोर्चानं सर्वात जास्त 34 जागा जिंकल्या आहेत. भाजपनं 21 जागांवर विजय मिळवला असून काँग्रेसला 16 जागा तर राष्ट्रीय जनता दलाला चार जागांवर विजय मिळाला आहे. दरम्यान, झारखंड मध्ये इंडिया आघाडीतील झारखंड मुक्ती मोर्चा , कॉग्रैस , राष्ट्रीय जनता दल, आणि मार्क्सवादी कम्युनिस्ट पक्ष या घटक पक्षांच्या नवनिर्वाचित आमदारांची आज रांची इथ मुख्यमंत्री हेमंत सोरेन यांच्या निवासस्थानी बैठक होणार असून, यावेळी आघाडीचा नेता निवडण्यात येणार आहे . हेमंत सोरेन यांचीच नेतेपदी  निवड होण्याची शक्यता असून , ते सत्ता स्थापनेचा दावा करणार आहेत .

**पोटनिवडणूक निकाल**

देशातल्या विविध 13 राज्यांमधल्या विधानसभा मतदारसंघातल्या पोटनिवडणुकीची मतमोजणीदेखील काल झाली. बिहारमध्ये 4 पैकी 2 जागा भाजपाला, एक हिंदुस्तानी आवामी मोर्चा आणि एक जागा संयुक्त जनता दलाला  मिळाली. पंजाबमधल्या चारपैकी तीन जागा आप ला मिळाल्या. तर काँग्रेस एका जागेवर विजयी झाली. कर्नाटकात काँग्रेसला तिनही जागांवरील पोटनिवडणुकीत यश मिळालं. मेघालयमध्ये एनपीपी, उत्तराखंडमध्ये भाजपाला विजय मिळाला. आसाममध्ये सर्व 5 जागा एनडीए कडे गेल्या असून त्यापैकी तीन भाजपला तर आसाम गण परिषद आणि युनायटेड पीपल्स पार्टीला प्रत्येकी एक जागा मिळाली आहे. केरळमध्ये काँग्रेस आणि मार्क्सवादी कम्युनिस्ट पक्षाला एकेक जागा मिळाली. राजस्थान विधानसभेच्या सात जागांच्या पोटनिवडणुकीत सत्ताधारी भाजपाला पाच  तर भारत आदिवासी पार्टी  आणि काँग्रेसला प्रत्येकी एक जागा मिळाली. पश्चिम बंगालमध्ये  सत्ताधारी तृणमूल काँग्रेसनं सर्व सहा जागा जिंकल्या. छत्तीसगडमधील पोटनिवडणुकीत  रायपूर शहर दक्षिण जागा भाजपनं पटकावली आहे. गुजरातमधील वाव ची जागा सत्ताधारी भाजपला मिळाली आहे. उत्तरप्रदेशातील नऊपैकी सात जागांवर भाजपनं तर समाजवादी पक्षानं दोन जागांवर विजय मिळवला. मध्य प्रदेशातील  विजपूर जागेवर काँग्रेसनं तर बुधनीच्या जागेवर भाजपनं विजय नोंदवला. सिक्कीम मधल्या दोन्ही जागांवर राज्यातील सत्ताधारी पक्षाच्या उमेदवारांची बिनविरोध निवड झाल्याची यापूर्वी  घोषणा करण्यात आली आहे.
देशातल्या 2 लोकसभा पोटनिवडणुकीची मतमोजणी ही काल झाली . केरळमधल्या वायनाड लोकसभा पोटनिवडणुकीत काँग्रेसच्या प्रियंका गांधी चार लाखाहून अधिक मतांनी निवडून आल्या आहेत. तर महाराष्ट्रातील नांदेड लोकसभा पोटनिवडणुकीत  काँग्रेसचे प्राध्यापक रवींद्र चव्हाण 1457 मतांनी विजयी झाले. त्यांनी भाजपाचे डॉ. संतुक हंबर्डे यांचा पराभव केला.

**सर्व पक्षीय बैठक**

संसदेचं हिवाळी अधिवेशन उद्यापासून सुरू होत आहे. त्या पार्श्वभूमीवर केंद्र सरकारनं आज सर्व पक्षीय बैठक बोलावली आहे. संरक्षण मंत्री राजनाथ सिंह यांच्या अध्यक्षतेखाली ही बैठक होणार आहे. अधिवेशनादरम्यान संसदेच्या दोन्ही संभागृहांचं कामकाज सुरळीत चालावं, यासाठी सर्व राजकीय पक्षांना आवाहन करण्यासाठी या बैठकीचं आयोजन करण्यात आलं आहे. संसदेच्या हिवाळी अधिवेशनाचं कामकाज  उद्यापासून सुरू होणार असून ते 20 डिसेंबरपर्यंत निश्चित करण्यात आलं आहे. या अधिवेशनादरम्यान  26 नोव्हेंबरला संविधान दिन साजरा केला जाणार आहे; त्या दिवशी संसदेचं सत्र होणार नाही.

**एस.जयशंकर**

भारताच्या सामाजिक-आर्थिक योजना आणि डिजिटल व्यवहारांचा व्यापक प्रभाव याची जगानं दखल घेतली  असून , जगाची भारताकडं पाहण्याची दृष्टी बदलली आहे,असं मत परराष्ट्र व्यवहार मंत्री एस जयशंकर यांनी व्यक्त केलं आहे. बेंगळुरू इथं सुरू असलेल्या  8व्या  भारत कल्पना परिषदेला दूरदृश्य प्रणालीद्वारे संबोधित करताना ते काल बोलत होते. एस जयशंकर पुढ म्हणाले की  गेल्या दशकात मोठा बदल झाला असून आता भारतात उद्योग व्यवसाय करण सुलभ झालं आहे. भारतानं डिजिटल तंत्रज्ञानात केलेली प्रगती प्रभावी असून गेल्या दशकातील कामगिरी जागतिक मानकांपेक्षाही चांगली आहे. मेक इन इंडिया मोहिमेनं देखील आकांक्षेपासून दृढनिश्चयाकडे परिवर्तन केल आहे, असही जय शंकर यांनी सांगितल.

**मन की बात**

पंतप्रधान नरेंद्र मोदी आज सकाळी 11  वाजता आकाशवाणीवरील 'मन की बात' या कार्यक्रमातून देश-परदेशातील जनतेशी संवाद साधणार आहेत. या मासिक कार्यक्रमाचा हा 116 वा भाग असेल. हा कार्यक्रम आकाशवाणी आणि दूरदर्शनच्या सर्व वाहिन्यांवरून आणि न्यूज ऑन एआयआर या मोबाईल ॲपवर प्रसारित केला जाईल.

**पंतप्रधान- ओडिशापर्व**

पंतप्रधान नरेंद्र मोदी आज नवी दिल्लीत ‘ओडिशा पर्व’ कार्यक्रमात सहभागी होऊन उपस्थितांना संबोधित करणार आहेत.ओडिशाच्या समृद्ध वारशाच्या सांस्कृतिक अभिव्यक्तींना प्रतिबिंबित करणाऱ्या या महोत्सवात ओडिशा राज्याच्या सामाजिक आणि सांस्कृतिक परंपरांचं प्रदर्शन करण्यात आलं आहे.  22 नोव्हेंबरला सुरू झालेल्या या महोत्सवाचा आज समारोप होत आहे.

**क्रिकेट**

बॉर्डर गावस्कर चषक कसोटी क्रिकेट मालिकेत, आज तिसऱ्या दिवसाचा खेळ सुरू झाल्यानंतर शेवटच वृत्त हाती आल तेव्हा भारताच्या दुसऱ्या डावात 1 बाद 202 धावा झाल्या आहेत.

**हवामान**

बंगालची खाडी आणि अंदमान निकोबार  द्वीप समूहाच्या परिसरातील समुद्रात आज वादळ येण्याची शक्यता असून त्यामुळे या  बेटांवर आज  जोरदार पाऊस  पडण्याची शक्यता आहे. तसच यामुळे पुढील 4 ते 5 दिवस तामिळनाडू ,पुददूचेरी, केरळ, कराईकल, माहे, आंध्र प्रदेशचा तटवर्ती भाग, इथ जोरदार ते अति जोरदार पाऊस पडण्याची शक्यता असून मच्छीमारांनी समुद्रात जाऊ नये असा इशारा हवामान विभागाने दिला  आहे .

**याबरोबरच हे राष्ट्रीय बातमीपत्र संपल,  नमस्कार**